# करिअर मार्गदर्शिका

## विद्यार्थी आणि पालकांसाठी संपूर्ण मार्गदर्शन

करिअरचे मार्ग | प्रवेश परीक्षा | शिष्यवृत्ती | शासकीय योजना

ANIKET CHAVAN
YOUTH INITIATIVE

CDS 2026
CAREER DISCOVERY SUMMIT, 2026

मोफत वाटप
Edition : 2026

# अनुक्रमणिका

**प्रिय विद्यार्थी आणि पालकांनो - श्री. अनिकेत चव्हाण — 4**

**प्रकरण 1 : दहावी नंतरच्या करिअरची निवड**

1.1 शाखांची निवड (कला / वाणिज्य / विज्ञान) 4

1.2 व्यावसायिक / तांत्रिक अभ्यासक्रम 4-5

**प्रकरण 2 : 12 वी नंतरच्या करिअरची निवड**

2.1 अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान 6

2.2 वैद्यकीय आणि आरोग्यसेवा 7

2.3 वाणिज्य, वित्त आणि व्यवस्थापन 7-8

2.4 कायदा शिक्षण व करिअर 8

2.5 पदवीनंतरच्या करिअर संधी 8-9

2.6 सर्जनशील क्षेत्रे 9-10

2.7 उदयोन्मुख करिअर क्षेत्रे 10-11-12-13

2.8 कृषी व संबंधित क्षेत्रे 14

2.9 क्रीडा व शारीरिक शिक्षण 14-15

**प्रकरण 3 : शिष्यवृत्ती आणि शासकीय योजना**

3.1 महाराष्ट्र राज्य शिष्यवृत्ती 16-17

3.2 केंद्र सरकारच्या शिष्यवृत्ती 17-18

3.3 इंटर्नशिप व अप्रेंटिसशिप योजना 18-19

3.4 प्रशिक्षण व सहाय्य संस्था 20

**प्रकरण 4 : प्रवेश परीक्षेचे वेळापत्रक**

4.1 प्रमुख प्रवेश परीक्षा 21

**प्रकरण 5 : करिअर निवड व मूल्यांकन**

5.1 करिअर निवडीचे मुद्दे 22

5.2 स्व-मूल्यांकन (SWOT Analysis) 23-24

# मनोगत

# करिअर मार्गदर्शिका

विद्यार्थी आणि पालकांसाठी संपूर्ण मार्गदर्शन

प्रिय विद्यार्थी आणि पालकांनो,

खरंतर आपल्या करिअरची वाट निवडणे हि एक आनंददायी प्रक्रिया असायला हवी परंतु आपल्या देशात तशी अवस्था नाही कारण करिअर हि आनंददायी प्रक्रिया न मानता आपण डोक्यावरचं ओझं मानतो आणि त्याच तणावापोटी बहुतांशवेळा चुकीचे निर्णय घेतो आणि परिणामी त्याचे परिणाम संपूर्ण कुटुंबाला भोगावे लागतात. प्रामुख्याने माहितीच्या आणि माध्यमांच्या अभावामुळे निमशहरी आणि ग्रामीण भागातील विद्यार्थी व पालकांना याचा मोठ्या प्रमाणात फटका बसतो.

एका संशोधनानुसार  टियर 2/3 शहरांमधील जवळपास 60% विद्यार्थी स्वतःची योग्यता आणि आवडीनिवडींऐवजी केवळ पालकांच्या अपेक्षांवर आधारित आपल्या करिअरची शाखा निवडतात. त्यामुळे सरतेशेवटी हाती निराशा येते आणि विद्यार्थी पालकांबरोबर स्वतःलाही कायम कोसत राहतो परिणामी अनेक वर्षे वाया जातात. त्यातून सावरून मोजके काहीजण करिअरची वेगळी वाट निवडतात पण काहींना  निर्णय चुकल्यामुळे पुढे फारस काही करता येत नाही त्या विद्यार्थ्यांच्या नुकसानाला जबाबदार कोण? म्हणून पालकांनो मुलांच्या करिअर बाबत सजग जरूर रहा पण तुमचे निर्णय त्यांच्यावर लादू नका  जग मोठ्या प्रमाणात विस्तारत असताना करिअरच्या अनेक संधी आपल्याला देऊ करत आहे परंतु आपण आजही केवळ मेडिकल, इंजिनिअरिंग फारफारतर वकील,सी.ए हेच करिअर ऑप्शन मानतो पण त्यापलीकडचीही क्षेत्र आपल्याला समजावीत.

विविध  विद्यापीठे, शिष्यवृत्त्या, सरकारी  योजना, परदेशातील  शिक्षणाच्या संधी यांची माहिती घेऊन खर्चिक वाटणारे शिक्षण कसे सुलभ करता येईल? या गोष्टीचा प्रामुख्याने विचार करता आम्ही करियर निवडीच्या या प्रक्रियेत तुमचे मित्र,मार्गदर्शक होऊ इच्छितो याचीच हि एक छोटीशी सुरवात !

*आपल्या मुलांचे मालक बनण्यापेक्षा*
*योग्य दिशादर्शक पालक बना !*

**-अनिकेत सोपान(काका) चव्हाण**
संचालक - धारेश्वर विद्या व क्रीडा प्रतिष्ठान

# प्रकरण 1 : दहावी नंतरच्या करिअरची निवड

एसएससी (दहावी) हा प्रत्येक विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एक महत्वपूर्ण टप्पा आहे. तुम्ही कोणत्या क्षेत्रात तुमचे करिअर करणार आहात.याची साधारणतः निवड इयत्ता दहावीनंतरच्या शाखानिवडीतून तुम्ही करता. हि निवड अंतिम नसते परंतु करियरच्या दृष्टीने महत्वाची असते.

## 1.1- इयत्ता 10 वी नंतर सामान्यपणे तीन शाखा असतात त्यापैकी एक तुम्ही निवडू शकता.

1) कला/आर्ट्स
2) वाणिज्य/कॉमर्स
3)विज्ञान/सायन्स
या तीनही शाखांमधून 12 वी पर्यंतचे शिक्षण घेतल्यांनंतर पुढे करिअरच्या कोणत्या संधी आहेत हे आपण पुढे पाहू.

## 1.2-दहावी नंतरचे व्यावसायिक / तांत्रिक अभ्यासक्रम

इयत्ता 10 वी नंतर तुमच्यासमोर व्यावसायिक अभ्यासक्रमाची निवड करून लवकर स्वतःचा आर्थिक स्रोत सुरू करण्याची संधी असते.आपण त्याबद्दलही माहिती घेऊ.

| कोर्सचे नाव (Name of Course) | कालावधी | करिअरची संधी (Career Outcome) | मुख्य फायदा (Key Benefit) |
|---|---|---|---|
| ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्था) | 1-2 वर्षे | इलेक्ट्रीशियन, फिटर, वेल्डर, मेकॅनिक, कॉम्प्युटर ऑपरेटर | जलद रोजगार, सरकारी नोकरीच्या संधी, कमी फी |
| पॉलिटेक्निक डिप्लोमा | 3 वर्षे | ज्युनियर इंजिनिअर, सुपरवायझर, टेक्निशियन | थेट द्वितीय वर्ष बी.ई.(B.E.) प्रवेश शक्य |
| पॅरामेडिकल डिप्लोमा | 2-3 वर्षे | लॅब टेक्निशियन, एक्स-रे टेक, ओटी (OT) टेक्निशियन | रुग्णालयांमध्ये मोठी मागणी |

| | | | |
|---|---|---|---|
| ANM/GNM नर्सिंग | 2-3 वर्षे | सरकारी/खाजगी रुग्णालयात परिचारिका(Nurse) | विद्यार्थिनींसाठी उत्तम, मोठी मागणी |
| डी. फार्म (D.Pharm) | 2 वर्षे | फार्मासिस्ट, मेडिकल स्टोअर | स्वयंरोजगाराची उत्तम संधी |
| सोलर टेक्निशियन | 6 महिने - 1 वर्ष | सोलर पॅनेल इन्स्टॉलर, मेंटेनन्स टेक्निशियन | 70+ सरकारी ITI संस्थांमध्ये सुरू. भारताच्या सौर अभियानांतर्गत मोठी मागणी |
| EV मेकॅनिक | 6 महिने - 1 वर्ष | इलेक्ट्रिक वाहन दुरुस्ती आणि देखभाल | DVET महाराष्ट्रद्वारे लॉन्च. EV मार्केटमध्ये वार्षिक 40% + वाट |
| ड्रोन पायलट (DGCA प्रमाणित) | 5-8 दिवसांचे प्रशिक्षण | शेती फवारणी, बांधकाम सर्वेक्षण, मीडिया, लॉजिस्टिक, देखरेख | 10 वी पास + 18 वर्षे वय आवश्यक. DGCA रिमोट पायलट सर्टिफिकेट. |

# प्रकरण 2 : 12 वी नंतरच्या करिअरची निवड

इयत्ता 12 वी नंतरची शैक्षणिक निवड तुमच्या करिअरच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची निवड असते. त्यामुळे 12 वी नंतरची करिअर निवड विद्यार्थी व पालकांनी अतिशय विचारपूर्वक करणे गरजेचे आहे.

## 2.1 अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान

| करिअर (Career) | पदवीचे नाव (Qualification) | प्रवेश परीक्षा (Entrance Exam) | कालावधी |
|---|---|---|---|
| कॉम्प्युटर सायन्स / IT इंजिनिअर | B.E. / B.Tech | JEE Main/Advanced, MHT-CET | 4 वर्षे |
| मेकॅनिकल इंजिनिअर | B.E. / B.Tech | JEE Main, MHT-CET | 4 वर्षे |
| सिव्हिल इंजिनिअर | B.E. / B.Tech | JEE Main, MHT-CET | 4 वर्षे |
| इलेक्ट्रिकल/ इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअर | B.E. / B.Tech | JEE Main, MHT-CET | 4 वर्षे |
| AI/ML इंजिनिअर | B.Tech CS + स्पेशलायझेशन | JEE, त्यानंतर प्लेसमेंट | 4 वर्षे |
| डेटा सायंटिस्ट | B.Tech/B.S C+M.Sc/PG डिप्लोमा | विविध परीक्षा | 3-5 वर्षे |
| सायबर सिक्युरिटी ॲनालिस्ट | B.Tech/BC A+ सर्टिफिकेशन | विविध परीक्षा | 3-4 वर्षे |

## 2.2 वैद्यकीय आणि आरोग्यसेवा

| करिअर (Career) | पदवीचे नाव (Qualification) | प्रवेश परीक्षा (Entrance Exam) | कालावधी |
|---|---|---|---|
| डॉक्टर (MBBS) | MBBS + MD/MS | NEET UG | 5. 5 + 2 वर्षे |
| दंतवैध (BDS) | BDS | NEET UG | 5 वर्षे |
| आयुर्वेदिक डॉक्टर(BAMS) | BAMS | NEET UG | 5.5 वर्षे |
| होमिओपॅथिक डॉक्टर(BHMS) | BHMS | NEET UG | 5.5 वर्षे |
| फिजिओथेरपिस्ट (BPT) | BPT | State CET / NEET | 4.5 वर्षे |
| फार्मासिस्ट (B.Pharm) | B.Pharm | MHT-CET / State Exam | 4 वर्षे |
| परिचारिका (B.Sc Nursing) | B.Sc Nursing | NEET / State Exam | 4 वर्षे |
| पशुवैद्यकीय डॉक्टर(B.V.Sc) | B.V.Sc | NEET / State CET | 5 वर्षे |

## 2.3 वाणिज्य, वित्त आणि व्यवस्थापन

| करिअर (Career) | पदवीचे नाव (Qualification) | प्रवेश परीक्षा (Entrance Exam) | कालावधी |
|---|---|---|---|
| चार्टर्ड अकाउंटंट (CA) | CA (ICAI) | CA Foundation, Inter, Final | 4-5 वर्षे |
| कंपनी सेक्रेटरी (CS) | CA (ICSI) | CS Foundation, Executive, Professional | 3-4 वर्षे |
| कॉस्ट अकाउंटंट (CMA) | CMA (ICMAI) | CMA Foundation, Inter, Final | 3-4 वर्षे |
| MBA ॲज्युएट | BBA/B.Com + MBA | CAT/XAT/MAT/CMAT | 3+2 वर्षे |

| | | | |
|---|---|---|---|
| इन्शुरन्स अॅक्युअरी (Actuary) | B.Sc गणित/सांख्यिकी + परीक्षा | Institute of Actuaries | 3-4 वर्षे |

## 2.4 कायदा शिक्षण व करिअरच्या संधी

कायदा (LAW) क्षेत्रातून तुम्हाला करिअरच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. यातून वकिली, न्यायपालिका, कॉर्पोरेट कायदेशीर क्षेत्र, नागरी सेवा इ. अनेक क्षेत्रांत तुम्ही आपले करिअर करू शकता.

| मार्ग (Path) | पदवीचे नाव (Qualification) | प्रवेश परीक्षा (Entrance Exam) | कालावधी |
|---|---|---|---|
| इंटिग्रेटेड लॉ (12 वी नंतर) | BA LLB / BBA LLB | CLAT, AILET, MH-CET Law | 5 वर्षे |
| LLB (पद्वीनंतर) | LLB | MH-CET Law, विद्यापीठ परीक्षा | 3 वर्षे |
| न्यायपालिका सेवा (Judicial Services) | LLB + MPSC Judicial | राज्य न्यायपालिका सेवा परीक्षा | LLB नंतर |
| कॉर्पोरेट लॉयर | LLB + स्पेशलायझेशन | प्लेसमेंट / इंटर्नशिप | 5-6 वर्षे |

## 2.5 पदवीनंतरच्या करिअर संधी

पदवीनंतरच्या काही संधी या तुम्ही कोणत्या क्षेत्रातून पदवीचे शिक्षण घेतले आहे यावर अवलंबून असतील तर काही संधी या सर्व शाखांसाठी खुल्या असतात.

| परीक्षा (Exam) | पदे (Posts) | पात्रता (Eligibility) | वयोमर्यादा (General) |
|---|---|---|---|
| UPSC CSE | IAS, IPS, IFS, IRS अधिकारी | कोणताही पदवीधर | 21-32 वर्षे |
| MPSC (महाराष्ट्र ) | उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, PSI | कोणतीही पदवीधर | 21-38 वर्षे |
| SSC CGL | टॅक्स इन्स्पेक्टर, ऑडिटर, SI | कोणतीही पदवीधर | 18-32 वर्षे |

| | | | |
|---|---|---|---|
| अन्न सुरक्षा (FSSAI/FDA) | फूड इन्स्पेक्टर, अन्न सुरक्षा अधिकारी | अन्न तंत्रज्ञान/कृषी/ विज्ञान पदवी | 18-30/35 वर्षे |
| रेल्वे (RRB NTPC) | स्टेशन मास्टर, क्लर्क, कमर्शियल | 12 वी / पदवीधर | 18-33 वर्षे |
| बँकिंग (IBPS/SBI) | PO, क्लर्क, स्पेशालिस्ट ऑफिसर | कोणतीही पद्वीधर | 20-30 वर्षे |
| संरक्षण (NDA/CDS) | लष्कर, नौदल, हवाई दल अधिकारी | 12 वी (NDA) / पदवीधर (CDS) | 16.5-19 (NDA) |
| कृषी सेवा (MPSC Agri) | कृषी अधिकारी (AO) | कृषी पदवी (B.Sc Agri) | 18-38 वर्षे |
| पोलीस ) (महाराष्ट्र | कॉन्स्टेबल, PSI, ASI | 12 वी / पदवीधर | 18-28 वर्षे |
| शिक्षण (TET/NET) | शालेय शिक्षक, प्राध्यापक | B.Ed / M.A. + NET | बदलू शकते |
| नगर परिषद भरती | मुख्याधिकारी (CO), कर निरीक्षक | कोणतीही पदवीधर | 18-38 वर्षे |

## 2.6 इतर सर्जनशील क्षेत्रे / Other Creative Feilds

| **करिअर (Career)** | **पदवीचे नाव (Qualification)** | **प्रवेश परीक्षा (Entrance Exam)** | **कालावधी** |
|---|---|---|---|
| फॅशन डिझाइनर | B.Des फॅशन | NIFT, NID, UCEED | 4 वर्षे |
| इंटिरियर डिझाइनर | B.Des इंटिरियर | NIFT, NID, CEED | 4 वर्षे |
| ग्राफिक/UI-UX डिझाइनर | BFA/B.Des + पोर्टफोलिओ | NID, पोर्टफोलिओ आधारित | 3-4 वर्षे |
| फिल्म/ ॲनिमेशन | B.Sc ॲनिमेशन/फिल्म | संस्था-विशिष्ट (Institute-specific) | 3 वर्षे |

| | | | |
|---|---|---|---|
| फोटोग्राफर /व्हिडिओग्राफर | डिप्लोमा/ स्व-शिक्षित + पोर्टफोलिओ | नाही | 1-3 वर्षे |
| कंटेंट क्रिएटर /यूट्यूबर | कोणतीही पारविभूमी + कौशल्ये | नाही | स्वतःच्या गतीने |

## 2.7 उद्योन्मुख आणि भविष्यासाठी सज्ज करिअर क्षेत्रे

तंत्रज्ञान झपाट्याने विकसित झाल्यामुळे 2030 सालापर्यंत खालील क्षेत्रांमध्ये करिअरच्या असंख्य संधी उपलब्ध होणार आहेत.

| करिअर (Career) | यासाठी काय करावे ? | मुख्य कौशल्ये (Key Skills) |
|---|---|---|
| आर्टिफिशियल इंटेलिजन्स / ML इंजिनिअर | B.Tech CS/IT + ऑनलाइन कोर्सेस (Coursera, NPTEL) | Python, ML फ्रेमवर्क्स, गणित |
| डेटा सायन्स आणि ॲनालिटिक्स | B.Sc सांख्यिकी/गणित / CS +PG डिप्लोमा/M.Sc | Python, R, SQL, सांख्यिकी(Statistics) |
| सायबर सिक्युरिटी स्पेशालिस्ट | BCA/B.Tech +CEH/ CISSP सर्टिफिकेशन्स | नेटवर्किंग, एथिकल हॅकिंग |
| डिजिटल मार्केटिंग | कोणतीही पदवी + Google/HubSpot सर्टिफिकेशन्स | SEO, सोशल मीडिया, ॲनालिटिक्स |
| इलेक्ट्रिक व्हेईकल (EV) टेक्नॉलॉजी | B.Techमेकॅनिकल/ इलेक्ट्रिकल | EV सिस्टम्स, बॅटरी तंत्रज्ञान |
| ड्रोन टेक्नॉलॉजी | B.Tech + DGCA सर्टिफिकेशन | ड्रोन ऑपरेशन, GIS मॅपिंग |
| रिन्यूएबल एनर्जी (अक्षय ऊर्जा) | B.Tech एनर्जी / इलेक्ट्रिकल + M.Tech | सोलर, विंड, एनर्जी सिस्टम्स |
| क्लाउड कम्प्युटिंग / DevOps | BCA/B.Tech + AWS/Azure सर्टिफिकेशन्स | क्लाउड प्लॅटफॉर्म्स, CI/CD, Linux |

## सर्वात वाढता स्कोप असणारे क्षेत्रः AI

AI (कृत्रिम बुध्दिमत्ता) हि अनेक लोकांना त्यांच्या करिअरसाठी धोका वाटत असली तरी ही एक संधी आहे. जो स्वतःमध्ये या धावत्या युगाला अपेक्षित असणारे बदल करेल त्याला AI या संधीचे वाहन करून निश्चितपणे खूप पुढे जात येईल कारण सध्याच्या युगात जागतिक स्तरावरील नामांकित कंपन्या पद्वीपेक्षा कौशल्यांना जास्त महत्त्व देतात. जो विद्यार्थी AI टूल्सचा सुयोग्यपणे वापर करू शकतो, डेटाचे विश्लेषण करू शकतो आणि चांगला संवाद साधू शकतो अश्या विद्यार्थ्यांना कायमच मागणी असेल.

> **AI मुळे कमी होणा-या नोक-याः** डेटा एंट्री, बेसिक अकाउंटिंग, साधी कस्टमर सर्विस, मॅन्युअल टेस्टिंग.

> **AI मुळे निर्माण होणा-या नोक-याः** AI ट्रेनर्स, प्रॉम्प्ट इंजिनियर्स, डेटा ॲनालिस्ट, रोबोटिक्स तंत्रज्ञ.

> **Ai कोणाला मदत करेल:** डॉक्टर, नर्स, डिझाइनर, आणि कुशल कारागीर (इलेक्ट्रिशियन, प्लंबर ज्यांचे काम AI प्रत्यक्ष करू शकत नाही).

### पदवीपेक्षा कौशल्ये जास्त महत्त्वाची

गुगल, आयबीएम आणि इन्फोसिस सारख्या कंपन्या आता फक्त तुमची पदवी न बघता तुमच्याकडे असलेल्या कौशल्यांवर आधारित नोकरी देतात.

### प्रत्येक विद्यार्थ्याने आत्मसात करावी अशी कौशल्येः

| कौशल्य श्रेणी | उदाहरणे | हे का महत्त्वाचे आहे? |
|---|---|---|
| डिजिटल साक्षरता (Digital Literacy) | संगणकाचे मूलभूत ज्ञान, MS Office, Google Workspace, ChatGPT सारखी AI साधने वापरणे. | आज प्रत्येक नोकरीसाठी डिजिटल कौशल्यांची गरज आहे. अगदी शेती, शैक्षणिक क्षेत्र आणि सरकारी कामातही याची आवश्यकता आहे. |
| संवाद कौशल्य (Communication) | इंग्रजी बोलणे, सादरीकरण (Presentation), व्यावसायिक लेखन, मराठी-इंग्रजी द्विभाषिक क्षमता. | तुमची मराठी-इंग्रजी दोन्ही भाषांवरील पकड ही एक मोठी ताकद आहे कंपन्यांना अशा लोकांची गरज आहे जे दोन्ही भाषांमध्ये प्रभावीपणे काम करू शकतात. |

| | | |
|---|---|---|
| डेटा कौशल्ये (Data Skills) | बेसिक एक्सेल (Excel), तक्ते/आलेख वाचणे, आकडेवारी समजून घेणे, डेटाचा अर्थ लावणे. | डेटा ही प्रत्येक व्यवसायाची नवीन भाषा आहे- डॉक्टर, वकील, शेतकरी आणि शिक्षक सर्वांना याची गरज आहे. |
| AI आणि तंत्रज्ञान जागरूकता | AI उत्पादकतेसाठी टूल्स वापरणे, AI कसे कार्य करते हे समजून घेणे, कोडिंग किंवा नो-कोड टूल्स. | जे लोक AI सोबत काम करायला शिकतील ते न शिकणा-यांची जागा घेतील- AI मानवाची जागा घेणार नाही, तर AI वापरणारा माणूस घेईल. |

एआय (AI) केवळ संगणक विज्ञान पद्वीधरांसाठी नाही. एआय प्रत्येक क्षेत्रात कशाप्रकारे संधी निर्माण करत आहे ते पाहूया.

**अधिक माहितीसाठी विनामूल्य प्लॅटफॉर्मः** SWAYAM, NPTEL, Coursera, Google Digital Garage.

## नवीन करिअर क्षेत्रे : पर्यावरण, शाश्वतता आणि हरित ऊर्जा

भारत 2070 पर्यंत 'नेट झिरो' उत्सर्जनासाठी कटिबध्द आहे. त्यामुळे पर्यावरणाशी निगडित नवीन करिअरच्या अनेक संधी निर्माण होत आहेत.

| करिअर (Career) | कामाचे स्वरुप | यासाठी काय करावे ? | वाढीची संधी (Growth Potential) |
|---|---|---|---|
| सौर ऊर्जा तंत्रज्ञ (Solar Energy Technician) | सोलर पॅनेल - सिस्टम बसवणे, त्यांची देखभाल आणि दुरुस्ती करणे. | ITI/डिप्लोमा इलेक्ट्रिकल + सोलर ट्रेनिंग | प्रचंड - भारताचे 2030 पर्यंत 500 GW नूतनीकरणक्षम ऊर्जेचे लक्ष्य आहे. |
| पर्यावरण अभियंता (Environm-ental Engineer) | प्रदूषण, कचरा व्यवस्थापन आणि जलशुध्दीकरणा साठी उपाय योजना तयार करणे. | B.Tech Environme-ntal Engineering | उच्च-प्रत्येक कारखाना आणि शहराला पर्यावरणीय नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| सस्टेनेबिलिटी सल्लागार (Sustainab-ility Consultant) | कंपन्यांना कार्बन फुटप्रिंट कमी करण्यात आणि ESG ध्येये गाठण्यात मदत करणे. | कोणतीही पद्वी + सस्टेनेबिलिटीमध्ये MBA/PG. | खूप उच्च -अनिवार्य ESG रिपोर्टिंगमुळे या कामाला मोठी मागणी आहे. |
| हवामान डेटा विश्लेषक (Climate Data Analyst) | हवामान डेटाचे विश्लेषण करणे, शेती आणि नियोजनासाठी हवामानाचा अंदाज वर्तवणे. | B.Sc सांख्यिकी/ भूगोल + डेटा स्किल्स. | वाढती – शेती आणि आपत्ती व्यवस्थापनासाठी हे अत्यंत महत्त्वाचे आहे. |
| इलेक्ट्रिक वाहन (EV) तंत्रज्ञ (EV Technician) | इलेक्ट्रिक वाहने आणि चार्जिंग, पायाभूत सुविधांची देखभाल व दुरुस्ती करणे. | डिप्लोमा/ITI ऑटोमोबाईल + EV ट्रेनिंग. | अति उच्च -भारताची EV बाजारपेठ दरवर्षी 40% पेक्षा जास्त वेगाने वाढत आहे. |
| कचरा व्यवस्थापन तज्ञ (Waste Management Specialist) | कचरा रिसायकलिंग आणि प्रक्रिया प्रणालींची रचना व व्यवस्थापन करणे. | B.Tech/B.SC Environme-ntal + डिप्लोमा. | उच्च - स्वच्छ भारत आणि स्मार्ट सिटी मिशनमुळे याला प्राधान्य आहे. |
| ग्रीन बिल्डिंग आर्किटेक्ट (Green Building Architect) | ऊर्जा-कार्यक्षम आणि पर्यावरणापूरक इमारतींचे डिझाइन तयार करणे. | B.Arch + ग्रीन बिल्डिंग प्रमाणपत्र (IGBC/LEE D). | वाढती – ग्रीन - बिल्डिंग मार्केट झपाट्याने विस्तारत आहे. |
| जलसंपत्ती व्यवस्थापक (Water Resource Manager) | पाणी संवर्धन, पाणलोट विकास आणि रेन वॉटर हार्वेस्टिंगचे व्यवस्थापन. | B.Sc/B.Tech+ विषयातील विशेष प्राविण्य. | महत्त्वाची - पाण्याची टंचाई हे भारतापुढील सर्वात मोठे आव्हान आहे. |

जागतिक स्तरावरील संधी : ग्लोबल वॉर्मिंगचा वाढता धोका लक्षात घेता संपूर्ण जगच नैसर्गिक संसाधनांचा वापर करत आहे त्यामुळे पर्यावरणाशी निगडित कोणत्याही क्षेत्रात प्रचंड वाव आहे.

## 2.8 कृषी, दुग्धव्यवसाय आणि संबंधित क्षेत्रे

भारत हा कृषिप्रधान देश आहे. आपल्याकडे शेतजमिनीची उपलब्धता आहे त्यामुळे कृषी व अन्य जोडधंद्यांच्या माध्यमातूनही आपण स्वयंरोजगार तयार करू शकतो. मात्र त्याचेही शिक्षण घेतले असेल तर अधिक कुशलतेने तुम्हाला विकास करता येईल.

| क्षेत्र | कोर्सचे नाव | विकसित होणारी मुख्य कौशल्ये (Key Skills) |
|---|---|---|
| अ‍ॅग्रीकल्चर | B.sc / B.Tech Agriculture | शेतीविषयक ज्ञान, संशोधन वृत्ती |
| डेअरी टेक्नॉलॉजी | B.Tech डेअरी टेक्नॉलॉजी | दुग्ध प्रक्रिया, गुणवत्ता नियंत्रण |
| फूड टेक्नॉलॉजी | B.Tech फूड टेक / B.Sc फूड सायन्स | अन्न प्रक्रिया (Processing), पॅकेजिंग |
| अ‍ॅग्रीकल्चरल इंजिनिअरिंग | B.E. / B.Tech अ‍ॅग्रीकल्चर | मशिनरी डिझाइन, सिंचन व्यवस्थापन |
| फिशरीज सायन्स | B.F.Sc (Bachelor of Fisheries Science) | मत्स्यपालन, जलचर संवर्धन |
| अ‍ॅग्रीबिझनेस मॅनेजमेंट | MBA in Agribusiness /PGDM | मार्केटिंग, कृषी व्यापार व्यवस्थापन |
| हॉर्टिकल्चर स्पेशालिस्ट | B.Sc हॉर्टिकल्चर | वनस्पती शास्त्र, फळबागांचे नियोजन |

## 2.9 क्रीडा आणि शारीरिक शिक्षण

| क्षेत्र | कोर्सचे नाव | विकसित होणारी मुख्य कौशल्ये (Key Skills) |
|---|---|---|
| शारीरिक शिक्षण शिक्षक (PE Teacher) | B.P.Ed / M.P.Ed पदवी | खेळण्याचे कौशल्य, अध्यापन, शिस्त |
| स्पोर्ट्स कोच (प्रशिक्षक) | संबंधित खेळातील प्रविण्य + NIS कोचिंग सर्टिफिकेट | नेतृत्व, तांत्रिक विश्लेषण, धोरण |

| | | |
|---|---|---|
| स्पोर्ट्स मॅनेजमेंट | MBA / डिप्लोमा इन स्पोर्ट्स मॅनेजमेंट | इव्हेंट मॅनेजमेंट, मार्केटिंग, लॉजिस्टिक |
| स्पोर्ट्स फिजिओथेरपिस्ट | BPT + स्पोर्ट्स मेडिसिन स्पेशलायझेशन | दुखापत उपचार, फिटनेस ट्रेनिंग |
| स्पोर्ट्स जर्नालिस्ट (क्रीडा पत्रकार) | मास कम्युनिकेशन /पत्रकारिता पदवी | खेळाचे सखोल ज्ञान, लेखन, संवाद |
| प्रोफेशनल खेळाडू | राज्य/राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा + SAI प्रशिक्षण | शारीरिक क्षमता, चिकाटी, मानसिक बळ |

..........

# प्रकरण 3 : शिष्यवृत्ती आणि शासकीय योजना

शासनस्तरावर शिक्षणासाठी अनेक शिष्यवृत्ती व योजना आहेत परंतु त्या योजनांची माहिती ब-याचदा विद्यार्थी व पालक यांच्यापर्यंत पोहचत नाही आणि ते त्यांना मिळू शकणा-या सुवर्णसंधीपासून वंचित राहतात.

## 3.1 महाराष्ट्र सरकार सरकारी शिष्यवृत्ती

> शैक्षणिक शिष्यवृत्तीसाठी तुम्हाला
> महाडीबीटीपोटल (mahadbt.maharashtra.gov.in) आणि राष्ट्रीय
> शिष्यवृत्ती पोर्टल (scholarships.gov.in) द्वारे अर्ज करता येतो.

अ. महाराष्ट्र राज्य शिष्यवृत्ती (महाडीबीटी मार्गे):

| शिष्यवृत्ती (Scholarship) | कोणासाठी (For Whom) | फायदे (Benefits) | उत्पन्नाची मर्यादा (Income Limit) |
|---|---|---|---|
| मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती (SC) | SC विद्यार्थी, इयत्ता 11 वी पुढील शिक्षण | पूर्ण शिक्षण शुल्क + निर्वाह भत्ता (Maintenance Allowance) | 12.5 लाख |
| मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती (ST) | ST विद्यार्थी, इयत्ता 11 वी पुढील शिक्षण | पूर्ण शिक्षण शुल्क + निर्वाह भत्ता | 12.5 लाख |
| मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती (OBC) | OBC विद्यार्थी, इयत्ता 11 वी पुढील शिक्षण | शिक्षण शुल्क + परीक्षा शुल्क | 1.5 लाख |
| मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती (VJNT/SBC) | VJNT/SBC विद्यार्थी | शिक्षण शुल्क + निर्वाह भत्ता | 1.5 लाख |
| राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती | आर्थिकदृष्ट्या मागास (EBC) विद्यार्थी | शिक्षण शुल्क परतावा (Reimbursement) | 8 लाख |
| EBC शुल्क परतावा | आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्ग | व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी पूर्ण शुल्क परतावा | 8 लाख |
| राज्य मुक्त गुणवत्ता शिष्यवृत्ती | गुणवंत (Top merit) विद्यार्थी | मासिक विद्यावेतन (Monthly stipend) | गुणवत्तेवर आधारित |

## ब. विद्यार्थिनींसाठी शिष्यवृत्तीः

| शिष्यवृत्ती (Scholarship) | फायदे (Benefits) | पात्रता (Eligibility) |
|---|---|---|
| सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती | मागासवर्गीय विद्यार्थिनींसाठी पूर्ण शिक्षण शुल्क माफी. | उच्च शिक्षण घेणा-या विद्यार्थिनी, महाराष्ट्र अधिवास (Domicile). |
| AICTE प्रगती शिष्यवृत्ती | तांत्रिक कोर्सेससाठी ₹50,000 प्रति वर्ष. | AICTE मान्यताप्राप्त कोर्स, कौटुंबिक उत्पन्न <₹8 लाख. |
| CBSE सिंगल गर्ल चाईल्ड स्कॉलरशिप | एकुलत्या एक मुलीसाठी विद्यावेतन (Stipend). | CBSE उत्तीर्ण, पालकांची एकुलती एक मुलगी. |
| इंदिरा गांधी शिष्यवृत्ती (UGC) | पदव्युत्तर (PG) शिक्षण घेणा-या एकुलत्या एक मुलीसाठी. | मान्यताप्राप्त विद्यापीठात PG साठी प्रवेश. |
| महाराष्ट्र शासन 100% शुल्क माफी | मुलींसाठी पूर्ण शिक्षण शुल्क माफी. | सरकारी/अनुदानित (Aided) महाविद्यालयातील विद्यार्थिनी. |
| बेगम हजरत महल शिष्यवृत्ती | अल्पसंख्याक विद्यार्थिनींसाठी आर्थिक मदत. | इयत्ता 9-12 वी, अल्पसंख्यांक समुदाय, उत्पन्न 8 12 लाख. |

## 3.2 केंद्र सरकारच्या शिष्यवृत्तीः

| शिष्यवृत्ती (Scholarship) | कोणासाठी (For Whom) | पात्रता आणि निकष (Eligibility) | फायदे (Benefits) |
|---|---|---|---|
| नॅशनल टॅलेंट सर्च (NTSE) | इयत्ता 10 वी मधील गुणवंत विद्यार्थी | राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा परीक्षा | 11 वी-12 वीः 11,250/महिना; पदवी-Ph.D: ₹2,000/महिना |
| NMMS (नॅशनलमीन्स -कम- मेरिट) | इयत्ता 8 वी मधील विद्यार्थी | पालकांचे उत्पन्न ₹3.5 लाखापेक्षा कमी | ₹12,000 / वर्ष (12 वी पर्यंत) |
| PM यशस्वी (PM YASASVI) | OBC, EBC आणि DNT विद्यार्थी | 9वी किंवा 11वी मध्ये शिक्षण घेत असलेले | 9 वी: ₹75,000/वर्ष; 11 वीः ₹1,25,000/वर्ष |

| | | | |
|---|---|---|---|
| इन्स्पायर (INSPIRE-SHE) | विज्ञान शाखेतील पदवी विद्यार्थी | 12 वी बोर्डातील टॉप 1% विद्यार्थी | ₹80,000 / वर्ष (5 वर्षांपर्यंत) |
| सेंट्रल सेक्टर स्कीम (CSSS) | 12 वी उत्तीर्ण, कॉलेज विद्यार्थी | टॉप 20 पर्सेंटाईल मधील विद्यार्थी | पदवीसाठी 112,000/वर्ष; पदव्युत्तरसाठी 120,000/वर्ष |
| PM शिष्यवृत्ती (संबंधित दल) | माजी सैनिक / निमसरकारी दलातील मुले | 10 वी/12 वी मध्ये किमान 60% गुण | ₹3,000 / महिना (मुले आणि मुली दोघांसाठी) |
| Top Class Education (SC) | SC प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थी | नामांकित संस्थांमध्ये(IIT/ IIM इ.) प्रवेश | पूर्ण शैक्षणिक फी, राहण्याचा खर्च आणि लॅपटॉपसाठी मदत |
| बेगम हजरत महल | अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थिनी | 9 वी ते 12 वी; उत्पन्न 12 लाखापेक्षा कमी | ₹5,000 ते 16,000 /वर्ष |

## 3.3 शासकीय वेतनधारी इंटर्नशिप आणि अप्रेंटिसशिप योजना

सरकार विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामातील कौशल्ये शिकतानाही आर्थिक मदत व्हावी म्हणून प्रयत्न करते. शिक्षण घेत असताना अनुभवाबरोबर विद्यार्थ्यांना कामाचा किमान मोबदला मिळावा या अनुषंगाने काही योजना आहेत.

| योजना (Scheme) | काय मिळते? (What It Offers) | पात्रता (Eligibility) | विद्यावेतन-सरासरी (Stipend) |
|---|---|---|---|
| PMइंटर्नशिप योजना (PMIS) | 500 आघाडीच्या कंपन्यांमध्ये 12 महिने इंटर्नशिप. सरकारी विद्यावेतनासह अनुभवाची संधी. | 21-24 वर्षे,IIT/ IIM/AIIMS मधील नसावेत. SC/ST/OBC/PwD /EWS ला प्राधान्य. | ₹5,000/महिना + ₹6,000 एकवेळचे अनुदान. |
| NAPS (राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना) | उद्योगांमध्ये कामावर प्रशिक्षण. सरकार विद्यावेतनाचा 25% हिस्सा देते. | ITI/डिप्लोमा/ पदवी धारक, 14+ वर्षे वय. | ₹5,000 - 9,000/महिना (ट्रेडनुसार बदलतो). |

| | | | |
|---|---|---|---|
| NATS (राष्ट्रीय शिकाऊ उमेद्वारी प्रशिक्षण योजना) | इंजिनिअरिंग पदवी आणि धारकांसाठी 1 डिप्लोमा वर्षाची शिकाऊ उमेद्वारी. | इंजिनिअरिंग पदवी / डिप्लोमा, ताजे पदवीधर (Fresh Graduates). | ₹4,984 - 8,000/महिना. |
| AICTE-इंडस्ट्री इंटर्नशिप योजना | इंजिनिअरिंग आणि मॅनेजमेंट विद्यार्थ्यांसाठी कंपन्यांमध्ये इंटर्नशिप. | AICTE मान्यताप्राप्त संस्थांचे विद्यार्थी. | कंपनीनुसार बदलतो (Paid). |
| राजीव गांधी नॅशनल फेलोशिप | M.Phil/PhD करणा-या SC/ST विद्यार्थ्यांसाठी संशोधन फेलोशिप. | M.Phil/PhD साठी प्रवेश घेतलेले SC/ST विद्यार्थी. | ₹31,000/महिना (JRF स्तर). |
| CSIR/UGC NET JRF | विज्ञानात PhD करण्यासाठी ज्युनियर रिसर्च फेलोशिप. | CSIR NET/UGC NET JRF सह उत्तीर्ण. | ₹37,000/महिना + HRA (घरभाडे भत्ता). |
| महाराष्ट्र CM फेलोशिप | विकास क्षेत्रात कामासाठी राज्यस्तरीय फेलोशिप. | महाराष्ट्राचे रहिवासी असलेले पदवीधर. | वर्षागणिक बदलतो. |
| Skill India - PMKVY | 300+ ट्रेड्समध्ये मोफत कौशल्य प्रशिक्षण,प्रमाणपत्र आणि नोकरीसाठी मदत. | 10 वी/12 वी उत्तीर्ण, कोणत्याही वयोगटासाठी. | मोफत प्रशिक्षण + प्लेसमेंट साहाय्य. |

**अर्ज कसा करावा:** NAPS/NATS साठी apprenticeshipindia.gov.in, PM इंटर्नशिप योजनेसाठी pminternship.mca.gov.in आणि PMKVY साठी pmkvyofficial.org वर नोंदणी करा.

## 3.4 महाराष्ट्रातील विशेष प्रशिक्षण आणि साहाय्य संस्था

स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी संपूर्ण मोफत मार्गदर्शन, अभ्यास साहित्य आणि आर्थिक सहाय्य मिळावे म्हणून सरकारने विशेष प्रशिक्षण व साहाय्य संस्था निर्माण केल्या आहेत.

| संस्था (Institute) | कोणासाठी (For Whom) | काय सुविधा मिळतात?(What They Provide) | अर्ज कसा करावा? (How to Apply) |
|---|---|---|---|
| BARTI (डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था) | SC विद्यार्थी | मोफत UPSC/ MPSC कोचिंग, 14,000/महिना विद्यावेतन (Stipend), अभ्यास साहित्य, वसतिगृह सुविधा. | barti.mahara-shtra.gov.in प्रवेश परीक्षेद्वारे वार्षिक निवड. |
| SARTHI (छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था) | मराठा / कुणबी / खुला प्रवर्ग विद्यार्थी | स्पर्धा परीक्षा कोचिंगसाठी ₹15,000 पर्यंत मदत, करिअर मार्गदर्शन, कौशल्य विकास कार्यक्रम. | sarthi.mahara-shtra.gov.in ऑनलाइन अर्ज करा. |
| TRTI (आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था) | ST/ आदिवासी विद्यार्थी | स्पर्धा परीक्षा कोचिंग, वसतिगृह सुविधा, परदेशी शिक्षणासाठी अर्थसाहाय्य, गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत. | trti.mahara-shtra.go v.in जिल्हा आदिवासी विकास कार्यालयामार्फत. |

..........

# प्रकरण 4: प्रवेश परीक्षेचे वेळापत्रक आणि तयारी

हे कॅलेंडर तुम्हाला तुमच्या तयारीचे वेळापत्रक आखण्यास मदत करते. बहुतांश परीक्षा या जानेवारी ते जून दरम्यान होतात.

## 4.1 प्रमुख प्रवेश परीक्षा – महिन्यानुसार

| महिना (Month) | परीक्षा (Exam) | कोणत्या करिअरसाठी? (ForWhich Career) | कोणाला देता येते? (Who Should Appear) |
|---|---|---|---|
| जानेवारी | JEE Main (सत्र 1) | इंजिनिअरिंग (IITS, NITS, GFTIS) | 12 वी सायन्स (PCM) |
| जानेवारी | CLAT | कायदा (NLUS) | 12 वी उत्तीर्ण (कोणतीही शाखा) |
| फेब्रुवारी | NATA | आर्किटेक्चर (वास्तुशास्त्र) | 12 वी सायन्स (PCM) |
| मार्च एप्रिल | MHT- CET | महाराष्ट्रातील इंजिनि-अरिंग आणि फार्मसी | 12 वी सायन्स |
| एप्रिल | JEE Main(सत्र 2) | इंजिनिअरिंग | 12 वी सायन्स (PCM) |
| मे | NEET UG | MBBS, BDS, BAMS, BHMS, नर्सिंग, पशुवैद्यकीय | 12 वी सायन्स (PCB) |
| मे | CUET UG | केंद्रीय विद्यापीठे (सर्व कोर्सेस) | 12 वी उत्तीर्ण (कोणतीही शाखा) |
| जून | JEE Advanced | केवळ IIT साठी | JEE Main मधील टॉप 2.5 लाख रँकर्स |
| जून | NDA (I) | संरक्षण दले (लष्कर, नौदल, हवाई दल) | 12 वी उत्तीर्ण/प्रविष्ट, वय 16.5-19 |
| ऑगस्ट | CA Foundation | चार्टर्ड अकाउंटन्सी(CA) | 12 वी उत्तीर्ण |
| सप्टेंबर | MPSC पूर्व परीक्षा | महाराष्ट्र राज्य लोकसेवा | पदवीधर, 19-38 वर्षे |
| नोव्हेंबर | NDA (II) | संरक्षण दले | 12 वी उत्तीर्ण/प्रविष्ट |
| डिसेंबर | CAT | MBA (IIMS) | कोणताही पदवीधर |

# प्रकरण 5: करिअर निवडीचे मूल्यांकन / Carrier Test

## करिअर निवड गांभीर्याने घ्या, नशिबावर सोडू नका !

मी माझ्या पाल्याच्या आवडीनिवडी लक्षात घेऊन करिअर तर निवडतोय पण ते नक्की योग्य आहे का? ते त्याच्या तात्पुरत्या आवडी निवडींवर आधारित तर नाही ना? याची भीती तुम्हाला एक पालक म्हणून वाटत राहणे साहजिक आहे. मग त्याला उपाय काय? विद्यार्थ्यांच्या करिअरची निवड नक्की कोणत्या मुद्द्यांच्या आधारे करायची? हा प्रश्न तुम्हाला पडणे साहजिक आहे. त्यामुळे पालकांनी व विद्यार्थ्यांनी करिअर निवड करत असताना खालील मुद्दे प्रामुख्याने विचारात घेतले पाहिजेत.

## 5.1 करिअर निवडीसाठीचे मुद्दे

स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी संपूर्ण मोफत मार्गदर्शन, अभ्यास साहित्य आणि आर्थिक सहाय्य मिळावे म्हणून सरकारने विशेष प्रशिक्षण व साहाय्य संस्था निर्माण केल्या आहेत.

**1. तुमचे व्यक्तिमत्त्व (Personality Strength):** तुम्ही अंतर्मुख आहात की बहिर्मुख? तुम्हाला लोकांसोबत काम आवडते, की डेटा-मशीनसोबत? तुमच्यात नेतृत्वगुण आहेत, की संशोधनाची वृत्ती ?

**2. तुमची आवड (Interests & Passions) :** तुम्ही अंतर्मुख आहात की बहिर्मुख? तुम्हाला लोकांसोबत काम आवडते, की डेटा-मशीनसोबत? तुमच्यात नेतृत्वगुण आहेत, की संशोधनाची वृत्ती ?

**3. तुमची बौध्दिक ताकद (Aptitude) :** तार्किक विचार (Logical Reasoning), भाषिक क्षमता, संख्यात्मक कौशल्य, सर्जनशीलता – तुमची बौध्दिक शक्ती नेमकी कुठे आहे? - सायकोमेट्रिक चाचणी हे सांगते.

**4. उपलब्ध संधी (Available Opportunities) :** तुमच्या प्रोफाइलशी कोणते करिअर जुळतात? बाजारात कशाला मागणी आहे? तुम्हाला शिष्यवृत्ती, आरक्षण किंवा सरकारी योजनांचा लाभमिळू शकतो का?

या सर्व बाबींचा विचार करून योग्य करिअर निवडीसाठी मदत करणारे www.pudheKai.com सारखे पर्याय आपल्या भाषेत आहेत. त्यावर आपण आपल्या विद्यार्थ्यांची कलचाचणी करू शकता.

## 5.2 स्व-मूल्यांकन (SWOT Analysis Matrix)

स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी संपूर्ण मोफत मार्गदर्शन, अभ्यास साहित्य आणि आर्थिक सहाय्य मिळावे म्हणून सरकारने विशेष प्रशिक्षण व साहाय्य संस्था निर्माण केल्या आहेत.

**SWOT Analysis Method (थोडक्यात) :** SWOT म्हणजे Strengths (बळकट बाजू), Weaknesses (कमकुवत बाजू), Opportunities (संधी), Threats ( अडथळे/धोके) यांचे विश्लेषण. ही पध्दत विद्यार्थ्यांची क्षमता, मर्यादा आणि भविष्यातील दिशा ओळखण्यासाठी उपयोगी पडते.

### SWOT ANALYSIS TEMPLATE

| STRENGHTS | WEAKNESSES |
|---|---|
| | |
| **OPPORTUNITIES** | **THREATS** |
| | |

SWOT या पध्दतीने स्वयंमूल्यमापन करण्यासाठी वरील रकान्यांमध्ये अनुक्रमे गोष्टी भरा.

### 1. शक्तीस्थाने (Strengths - S)

मी कोणत्या विषयात किंवा कामात सर्वात जास्त चांगला आहे. (उदा. चित्रकला, भाषण, गणित, सामान्य ज्ञान इ.)

### 2. उणिवा/कमतरता (Weaknesses - W)

मला कोणत्या विषयांची भीती वाटते किंवा ते कठीण जातात?
किंवा माझ्या कोणत्या सवयींमुळे मी मागे पडतो आहे?

### 3. संधी (Opportunities - O)

माझ्या आवडीच्या क्षेत्रात सध्या कोणत्या नवीन संधी उपलब्ध आहेत? (उदा. नवीन कोर्सेस, स्कॉलरशिप), माझ्या कौशल्यांचा वापर करून मी कोणते नवीन काम शिकू शकतो?

### 4. धोके/आव्हाने (Threats - T)

माझ्या ध्येयापर्यंत पोहोचण्यात कोणते अडथळे येऊ शकतात?
भविष्यात तंत्रज्ञानामुळे माझ्या आवडीच्या क्षेत्रातील नोक-या कमी होतील का?

### वापर कसा करावा:

हा चार्ट भरल्यानंतर विद्यार्थ्याच्या Strengths + Opportunities
यावर आधारित योग्य करिअर पर्याय ठरवावेत, आणि Weaknesses + Threats कमी करण्यासाठी कृती योजना तयार करावी

**टीप:** मुलांनो, तुमची उत्तरे प्रामाणिकपणे लिहा. हे कोणाशी स्पर्धा करण्यासाठी नसून स्वतःला अधिक चांगल्या प्रकारे ओळखण्यासाठी आहे!

..........

# अनिकेत चव्हाण युथ इनिशिएटिव्ह अंतर्गत उपक्रम

## › यात्रा शिक्षण विश्वाची

- केवळ शहरच नाही, तर ग्रामीण भागातील शाळांपर्यंत प्रत्यक्ष पोहोचून तिथली शैक्षणिक परिस्थिती आणि आव्हाने समजून घेण्याचा आमचा हा प्रामाणिक प्रयत्न आहे.
- शाळांना भेटी देऊन विद्यार्थ्यांच्या अडचणी जाणून घेणे आणि त्यांच्यापर्यंत शिक्षणातील नवनवीन प्रवाह व संधी पोहोचवून जनजागृती करणे, हे या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे.
- या प्रवासातून केवळ मार्गदर्शनच नाही, तर सद्यस्थिती अनुभवून आम्हालाही खूप काही शिकायला मिळत आहे.





## › यात्रा शिक्षण विश्वाची' पॉडकास्ट

- शिक्षण क्षेत्रातील दिग्गज आणि तज्ज्ञांशी थेट संवाद साधून त्यांचे अनुभव विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी आम्ही हे पॉडकास्ट सुरू केले आहे.
- तज्ज्ञांच्या विचारातून शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान देणे आणि भविष्यातील पिढीला समृद्ध करणे, हा यामागचा मूळ विचार आहे.





### > करिअर डिस्कव्हरी समिट (Career Discovery Summit 2026)

- विद्यार्थ्यांच्या मनातील करिअरविषयक शंका दूर करण्यासाठी 2026 पासून आम्ही या भव्य समिटची सुरुवात केली आहे.
- हे समिट दरवर्षी आयोजित केले जाणार असून, यामध्ये विविध क्षेत्रांतील नामवंत तज्ज्ञांना मार्गदर्शनासाठी निमंत्रित केले जाईल.
- भविष्यातील संधींची ओळख करून देणे आणि विद्यार्थ्यांच्या प्रत्येक प्रश्नाला योग्य उत्तर मिळवून देणे, हे या समिटचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.

CDS 2026

CAREER DISCOVERY SUMMIT, 2026

www.aniketchavanyouthinitiative.org

@aniket_chavan_youth_initiative

Aniket Chavan Youth Initiative

# नोट्स

# नोट्स

# नोट्स

# नोट्स

# नोट्स

# नोट्स